**सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम; १०७ जणांवर कारवाई**

जळगाव पोलीस दलामार्फत दिनांक 17/07/2026 रोजी सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या व्यक्तींविरुद्ध **विशेष मोहीम** राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेदरम्यान **महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११२/११७ अंतर्गत १०५ व्यक्तींवर, तसेच कलम ८५(१) अंतर्गत २ व्यक्तींवर अशी एकूण १०७ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.**

जळगाव जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणे टाळून कायद्याचे पालन करावे व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे **मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव** यांनी आवाहन केले आहे.

– जनसपंर्क अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव

8:21 AM